# अट्टल मत

RNI.No. MAHMAR/2007/21199

Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष -१८, अंक-३४ ■ छत्रपती संभाजीनगर, सोमवार, दि. १२ मे २०२५ ■ किंमत २ रूपये, पाने -४


# संत सेवालाल महाराज बंजारा लभाना तांडा समृद्धी योजनेच्या पदावरून रविकांत राठोड यांची उचलबांगडी करा!

**छत्रपती संभाजीनगर**

**(अट्टल मत प्रतिनिधी)**

**बंजारा समाजातील महिलांना फसविणारा महाठक, महिला किडण्यापर रविकांत राठोड यांना संत सेवालाल महाराज बंजारा लबाना तांडा समृद्धी योजनेच्या राज्यस्तरीय कार्यकांनी घेताना शासनास चरित्र संपन्न पदाधिकारी सापडलेच नाहीत का ?**

मूलभूत सुविधा पासून वंचित असलेल्या राज्यातील प्रत्येक तांड्यात संत सेवालाल महाराज बंजारा लबाना तांडा समृद्धी योजनेच्या राज्यस्तरीय योजनेतील रविकांत राठोड यांनी यापूर्वी बंजारा समाजातील अनेक महिलांना लाखोचा गंडा घातल्याप्रकरणी, एका बंजारा तरुणीचे जबरदस्ती घरात घुसून कुटुंबातील महिलांना मारहाण करून तरुणीला पळविल्या प्रकरणी, तसेच एका महिलेकडून लाखोचे दागिने हडपून सदर महिलेला स्वतःच्या पत्नीमार्फत मारहाण करायला लावणारा भामटा, महाठक, लबाड लांडगा बंजारा समाजातील रावणासूर रविकांत राठोड यांनी संत सेवालाल महाराज बंजारा तांडा लबाना समृद्धी योजनेतही छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका महिलेला पुढे करून सदर योजनेच्या प्रशासकीय मान्यता अक्षरशः पंधरा ते वीस टक्के रक्कम घेऊन विक्री केल्याचा प्रकारही त्याच्या संघटनेतील पदाधिकाऱ्यांकडून सध्या ऐकायला मिळाले आहे .

**बंजारा संघटनांची मागणी**

रविकांत राठोड हे यापूर्वी वेगवेगळ्या संघटनेत असतानाही कुकरत्या करीत असल्यानेच त्यांना संघटनेतून काढून टाकल्याचे समजले आहे त्यामुळे स्वतः बंजारा ब्रिगेड संघटना काढून सुशिक्षित तरुणांना, महिलांना विविध मार्गाने शासकीय कामे मिळवून देण्याची लालूच दाखवून अनेकांना फसविलेले आहे. याबाबतच नव्हे तर महिलांना प्रेमप्रकरणात गुंतवून मोठ मोठ्या रकमा उकळल्या प्रकार हि सदर महाठगानी केलेला आहे. याप्रकरणी काही महिलांनी चांगलीच धुलाई केल्याचा प्रकारही संभाजीनगरात काही दिवसापूर्वीच उघडकीस आलेला आहे.



बंजारा समाजातील महिलांना फसवून गडगंज माया जमविलेला महालोबी रविकांत राठोड यांनी लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीतही पोहरादेवी देवी येथील संत, महंतांना चांगल्या चार चाकी गाड्या घेऊन देण्याची लालूच दाखवून फसविल्याचा प्रकारही त्याच्याच कार्यकर्त्यांकडून ऐकायला मिळू लागले आहे बंजारा तांड्यांना चांगल्या मूलभूत सुविधा मिळवून देण्याच्या हेतूने राज्य शासनाने विधानसभेच्या निवडणुकीपूर्वी सुरू केलेल्या संत सेवालाल महाराज बंजारा लबाना तांडा समृद्धी योजनेतही अनेक गैरव्यवहार करूनही रविकांत राठोड सदर पदावर का आणि कोणाच्या फायद्यासाठी ठेवलेला आहे.

संत सेवालाल महाराज बंजारा लबाना तांडा समृद्धी योजनेत होत असलेल्या गैरप्रकाराला स्वतः रविकांत राठोड व इतर राज्यस्तरीय काही पदाधिकारी जबाबदार असल्याचेही ऐकायला मिळत आहे. त्यामुळे बंजारा समाजाच्या विकासासाठी सुरू करण्यात आलेली योजना ही मूलभूत सुविधा देण्यासाठी आहेत की या कमिटीतील पदाधिकाऱ्यांमार्फत गुत्तेदारांकडून कमीत कमी १० ते २५ टक्के पैसे उकळण्यासाठी ? राज्यस्तरीय काही पदाधिकाऱ्यांविरुद्ध बरेच गुन्हे दाखल असून काही महिने जेलची हवा खाऊन आलेली या समितीचे सदस्य म्हणून घेण्यात आलेच कसे ? बंजारा समाजातील समाज बांधव आजही अनेक अडचणीचा सामना करून कष्टाचे जीवन जगत आहे. परंतु सदर मेहनत करून जीवन जगणाऱ्या बंजारा समाजाच्या नावाने दलाली करून स्वतःचे काळे कृत्य पैशाच्या जोरावर दडपण्याचा प्रकारही संत सेवालाल महाराज बंजारा लबाना तांडा समृद्धी योजनेचे राज्यस्तरीय समितीतील सदस्य रविकांत राठोड करीत आहे.

रविकांत राठोड हा महाठग, लबाड लांडगा नव्हे तर महिला किडनॅपर महिलांवर अत्याचार करणारा कलियुगातील राक्षस असल्याने सदर पदावरून हटवा अशी मागणी करण्याची एकाही सदस्याची लायकी किंवा पात्रता आहे की नाही? बंजारा समाजातील रावणासूर रविकांत राठोड यांना यापूर्वी दाखला असलेल्या गुन्ह्याचा फेर तपास करून कडक कारवाई न केल्यास बंजारा ब्रिगेड संघटनेतील अनेकांचे संसार उध्वस्त होण्याची शक्यता बंजारा ब्रिगेडचे कार्यकर्तेच आपापसातील चर्चेत बोलू लागले आहेत. त्यामुळे रविकांत राठोड यांना संत सेवालाल महाराज बंजारा लबाना तांडा समृद्धी योजनेच्या राज्यस्तरी पदावरून हटवून त्यांच्याविरोधात दाखल असलेल्या गुन्ह्याचा फेर तपास करून कार्यवाही होईल अशी आशा बंजारा समाजात व्यक्त केली जात आहे.

तांडा समृद्धी योजनेचे प्रमुख महाठग रविकांत राठोड यांना पदावरून हटवितात की त्यांना पाठीशी घालतात हे लवकरच स्पष्ट होणार असल्याने समाजातील काही सामाजिक कार्यकर्ते सामाजिक माध्यमातून एक लिहिणारे अभ्यासक लक्ष ठेवून आहे. त्यामुळे रविकांत राठोड यांनाच नव्हे तर राज्य कार्यकारणीच रद्द न केल्यास सदर योजनेच्या प्रमुखाविरुद्धही काही संघटना आंदोलन करण्याची शक्यता आहे.

## उद्धव सरकारच्या काळातील खिचडी घोटाळा, आठ जणांवर आरोपपत्र दाखल

**मुंबई (अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराष्ट्रात उद्धव सरकार सत्तेत असताना आणि कोरोना संकट आले असताना खिचडी पाकीट वाटपाचा घोटाळा झाला. या घोटाळ्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने आठ आरोपींच्या विरोधात न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सूरज चव्हाण, अमोल कीर्तिकर, सुजित पाटकर यांचा आरोपींमध्ये समावेश आहे. पोलिसांनी आरोपींवर १४.५७ कोटी रुपयांचा घोटाळा केल्याचा आरोप केला आहे.

मेसर्स वैष्णवी किचन, सह्याद्री रिफ्रेशमेंटचे भागीदार आरोपी सुनील कदम उर्फ बाळा कदम, राजीव साळुंखे, सुजित पाटकर, तसेच 'फोर्स वन मल्टी सर्व्हिसेस'चे भागीदार संजय म्हशिलकर, प्रांजल म्हशिलकर, प्रीतम म्हशिलकर, सूरज चव्हाण, अमोल गजानन कीर्तिकर यांनी एप्रिल २०२० ते जुलै २०२० या कालावधीत मोफत वाटप करण्यात आलेल्या खिचडीमध्ये घोटाळा केल्याचा आरोप करण्यात आला होता. याबाबत तक्रार आल्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने प्राथमिक चौकशी केली.

गैरमार्गाने खिचडीवाटपाचे कंत्राट मिळिवणे, पात्रता निकषामध्ये बसत नसतानाही कंत्राट घेणे, ३०० ग्रॅमचे पाकीट द्यायचे असतानाही नफा मिळिवण्याच्या उद्देशाने १००-२०० ग्रॅम वजनाची खिचडी पाकिटे तयार करणे, असे गैरव्यवहार केल्याचे चौकशीतून समोर आले आहे. फक्त १००-२०० ग्रॅमची खिचडी पाकिटे अंदाजे २२ ते २४ रुपये अशा वेगवेगळ्या दरांनी घेऊन महापालिकेकडून मात्र प्रतिपाकीट ३३ रुपये घेण्यात आले. या फसवणुकी प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला. 'फोर्सवन मल्टी सर्व्हिसेस'चे मालक संजय म्हशीलकर, प्रांजल म्हशीलकर व प्रीतम म्हशीलकर यांनी संगनमताने स्नेहा कॅटरर्सचे संजय माळी यांच्याकडून खिचडी बनवून घेतली. खिचडी वाटप योजनेकरीता पात्र नसल्याचे माहिती असताना सूरज चव्हाण आणि अमोल कीर्तिकर यांच्या मदतीने खिचडीवाटपाचे कंत्राट मिळिवले आणि यासाठी बनावट दस्तावेज वापरले, असे आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासादरम्यान उघड झाले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात रक्तदान शिबीर



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

शहरातील रक्तपेढ्यांमध्ये रक्त साठ्यात तुटवडा असल्याने जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत जिल्हाधिकारी कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन केले. या शिबिरात जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी- कर्मचारी यांनी रक्तदान केले. ११रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात या शिबिराचे आयोजन करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, निवासी उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी मारुती म्हस्के, विधी अधिकारी श्रीमती वायाळ तसेच जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. डॉ. महेश लड्ढा व त्यांच्या सहकाऱ्यांनी रक्तदान विषयक प्रक्रिया पार पाडली. दुपार पर्यंत २५ जणांनी रक्तदान केले होते. रक्तदान सायंकाळपर्यंत सुरु राहणार आहे.

## बुद्ध पौर्णिमाचे महात्म्य

**भारतातच** नव्हे तर जगात वैशाख पौर्णिमा हा दिन अत्यंत महत्वाचा व शुभ मानल्या जातो. वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा संबोधल्या जाते. कारण या दिनी तथागत भगवान गौतम बुद्ध यांना ज्ञान प्राप्ती झाली, ज्या ज्ञान प्राप्तीने भगवान गौतम बुध्द याना जगातील मानव जातीच्या दुःखाचे मूळ नाहीसे करण्याचा मार्ग सापडला.

जगातील प्रत्येक मानव कोणत्या ना कोणत्या कारणाने दुःखी आहे. या दुःखामुळे मानव आपले जीवन अत्यंत निराशेत जगत असतो, कुटुंब, आप्तेष्ट,नातेवाईक यांच्याशी असलेले नाते ही दुःखी व्यक्ती विसरतो, या दुःखातून या भूतलावरील मानवाची सुटका व्हावी व त्याने आपले जीवन आनंद, समाधान व सुखाने जगावे म्हणून भगवान गौतम बुद्धांनी सर्व ऐहिक सुखाचा त्याग केला व या दुःखाचे मूळ शोधण्यासाठी बोधी वृक्षाखाली तपश्चर्या केली. या अविरत तपस्येनंतर त्यांना ज्ञान प्राप्ती झाली तो दिन हाच वैशाख पौर्णिमा होता म्हणून वैशाख पौर्णिमेला बुद्ध पौर्णिमा ही संबोधतात कारण याच दिवशी भगवान गौतम बुद्ध यांनी जीवनातील सर्व दुःखाचे मूळ कारण म्हणजे अहंकार होय असे जगताला सांगितले. या जीवनातील यश, समृद्धी, सुख, आनंद, ऐश्वर्य भविष्यात कधीही नष्ट होऊ शकते. याची या जगतातील प्रत्येकाने जाणीव ठेवून अहंकाराला दूर ठेवले पाहिजे, 'जे आपल्या सोबत आहे, त्यातच आनंद, सुख मानावे, अधिकची लालसा करू नये, आहे त्यात आनंद, सुख, वैभव मानणे हे खरे जीवन आहे व हेच खरे जगणे आहे,' आपणाला जे मिळाले आहे त्या बाबत आपण आभारी असावे व हे जग व या जगतातील प्रतेक बाब अधिक चांगली कशी करता येईल या साठी सर्वंकष प्रयत्न करावयास हवे, अशी शिकवण भगवान गौतम बुद्धांनी या जगताला दिली तो दिन म्हणजे 'वैशाख पौर्णिमा 'आणि तो 'दिन म्हणजेच बुद्ध पौर्णिमा' होय,या जगाला 'युद्ध नको बुद्ध हवा' ही काळाची गरज आहे, भगवान गौतम बुद्ध यांच्या शांती ला स्वीकारू या हीच खरी आदरांजली भगवान गौतम बुद्ध यांना असेल.

**-धोंडीरामसिंह राजपूत**

# आई सुसंस्काराची जननी

**आई** हा शब्द वात्सल्य, स्नेह, माया, ममता, दया,क्षमा, शांती, प्रेम, क्षमाशीलता, प्रामाणिकता यांनी भरलेला आहे. आई शब्दात जी जादू आहे. आई शब्दात जी किमया आहे.आई शब्दात जी आपुलकी, ओढ,व ममता आहे, ती अन्य कोणत्याही शब्दात नाही,आई हा शब्द मधुरतेने, गोडव्याने,व अमृताने भरलेला आहे,आई शब्दा सारखा गोडवा दुर्सया अन्य कोणत्याही शब्दात मिळत नाही,छोट्या बालकापासून वृद्धा पर्यंत या शब्दाचा उच्चर करणारी व्यक्ती कंटाळत नाही. ,जी व्यक्ती आई म्हणते तितक्याच स्नेह, ममतेने आई ‘हो कार’ सुद्धा देते ती कंटाळत नाही. आई शब्द उच्चरताच डोळ्या समोर ममतेची मूर्ती उभी राहते. आपला पुत्र किंवा पुत्री दिव्यांग असो की त्यांनी घोर अपराध केलेले असो आई साठी ते प्राणांहूनही प्रियच असतात. म्हणूनच आई ला सुसंस्काराची जननी व नैतिक मूल्यांचे भांडार म्हटल्यास वावगे ठरणार नाही. बालपणीच्या आईच्या संस्कारांनी घडलेली मुले-मुली मोठे पणी या समाजाची आदर्श नागरिक,व सुजाण पुत्र-पुत्री म्हणून नाव लौकीकास येतात आणि हीच मुलं या देशाची खरी आधारस्तंभ ठरतात, आईच्या बालपणातील संस्कारांनी मुलां-मुलींच्या मनाची निकोप ,व निरोगी वाढ होते,बाळ जन्मल्यापासून आईचे संस्कार आरंभ होतात. बालक चे लालन,पालन, संगोपन, संरक्षण, संवर्धन हे संस्कारच आहेत. आई अत्यंत स्नेह व ममतेने आपल्या बालकांची काळजी घेते. आई आपल्या पाल्याना गोंजारते, पाठीवरून हात फिरवीत असते. बोबडे बोल शिकविते. डोक्यावरून पाठीवरून हात फिरवत असते हे सुद्धा ममत्वाचे संस्कारच आहेत.

आईच्या बोलण्यात ही संस्कार असतात आई संस्कारांचा खजिना आहे,आई ज्या वेळी आपल्या पाल्यांशी बोलते ते बोलणं, ते शब्द म्हणजे सुसंस्कारच असतात. आईच्या बोलण्यातून कळत न कळत बाल मनाची जडण घडण होत असते. चांगले बोलणे, चांगल्या गोष्टी व कथा सांगणे, प्रामाणिकता पाळणे, दया, क्षमा, शांती,माया या सद्गुणांचा वारंवार वापर करणे हे बाल मनावर होणारे सुसंस्कारच आहेत. जे बालपणी बाल मनावर बिंबविल्यास ते कायम स्वरूपी लक्षात राहतात आणि हेच संस्कार बालपणी आवश्यक असतात. जे आई द्वारे घडत असतात, आईच्या माधुर्य पूर्ण बोलातून तसेच तिच्या रागावण्यातूनही सुसंस्कार बालमनावर बिंबवले जातात. आई आपल्या चिमुकल्यांना नीतीच्या,नैतिकतेच्या ऐतिहासिक व धार्मिक गोष्टी सांगून चिमुकल्याच्या मनाची जडण -घडण करीत असते,आईचे बालपणीचे उपदेश,व संस्कार प्रौढ पणी अत्यंत मार्गदर्शक ठरत असतात, नैतिकता व नीतीमूल्ये आई पासून मिळणारे अमोल मूल्ये आहेत,माझे मुलं-मुली समाजात वावरताना त्यांनी यांचा वापर करताना बघताना आईला खूप आनंद होतो. संस्कृती व सांस्कृतिक मूल्ये आई कडूनच प्राप्त होतात ते आईच्या प्रत्येक शब्दातून व कृतीतून प्रकर्षाने जाणवतात,’माझी आई,आदर्शाची साक्षात मूर्ती हे, आई समाजाचे आदर्श आहेत. कुटुंबातील एकमेव माया, ममता व आदर्श व्यक्तिमत्व होय,आई च्या बोलण्या चालण्यातून बरीच उगमस्थाने जसे समानता, सामंजस्य, चारित्र्य, दया, क्षमा, सहानुभूती, मानवता, दान,धर्म, कर्मकर्तव्य,आज्ञा धारक पणा, नम्रता, स्वाभीमान,मान,सन्मान सारखे मुलांवर बरसत असतात, आई जगातील सर्वात श्रेष्ठ पुज्यनिय दैवत आई आंहे. आई पेक्षा श्रेष्ठ दैवत जगात नाही जगातील प्रत्येक मुलां मुलींनी आई ची मनोभावे सेवा व वृद्धापकली त्याची काठी बनवावी व सेवा करावी अशी अपेक्षा आहे.

## आईची ओटी

आईच्या पदराची
महान असे ओटी
यापुढे मंदिर, मस्जिद
खूप खूप छोटी
आईच्या ओटीत
सर्व देवांची वस्ती
मुलांसाठी आईची
रात्रंदिन गस्ती
आईच्या ओटीचा
जो घेतो सहारा
तेहतीस कोटी देवांचा
मिळे त्यास आसरा
आईच्या ओटीचा
आसरा घेऊन या
सर्व देवांचे दर्शन
आईतच घेऊन या,
आईच्या रूपातच
सर्व देव भेटती
धार्मिक स्थळे फक्त
समाधानाला असती
आईतच सर्व
देव बघू या
मनापासून आईची
सेवा करू या....

# जगातील सर्वश्रेष्ठ दैवत आई

**‘आई’ हा शब्द मधुरतेने भरलेला आहे. एका लहान बालकापासून ते मोठ्यातल्या मोठ्या वृद्धांपर्यंत आई उच्चारने म्हणजे परम आनंदाची अनुभूती प्राप्त करणे होय. आई या शब्दाची महानता शब्दात व्यक्त करता येत नाही ती प्रत्यक्ष उच्चारण्यात व अनुभवण्यात असते. आई, माय, माँ, मदर, मम्मी, मॉम हे शब्द उच्चातरताच उच्चारणाऱ्या समोर एक ममंतायी मूर्ती उभी राहते. जी मूर्ती दया, क्षमा, शांती, माया, ममता, ममत्त्वाने ओतपोत भरलेली असते आई म्हणजे वात्सल्य, प्रेम, सहानुभूती, ममताचा खजिना आहे. आई म्हणजे साक्षात परमेश्वर होय.**

**तोंडातून** उच्चार निघतो ‘अग आई गं’ अशी ही माता दिसताच, तिचा पाठीवरून हात फिरताच सारे प्रश्न साऱ्या वेदना क्षणात दूर होतात. फुलांची कोमलता, वृक्षाची सावली, आईच्या ठायी ठायी आहे. काट्यांच्या यातनांचा लवलेशही आईच्या सावलीत नाही. आपल्या मुला-मुलींना जीवापलीकडे जपणारी माता स्वत: दु:खाचे डोंगर झेलते पण बाळांना सुखाचा स्पर्श देते. अगदी पशु, पक्षी यांचीही उदाहरणे ह्या मातेची ममता. मातेचे वात्सल्य सर्वांच्या ठिकाणी अमुल्यच. या माया, ममता, वात्सल्याची तुलना जगात अन्य कोणाशी होवू शकत नाही.

फक्त जन्म देणे आईचे कर्तव्य नाही- बालक बालिकेला केवळ जन्म देणे ऐवढेच मातेचे कर्तव्य नाही. फक्त जन्म देण्याइतपतच कर्तव्य मानणारी आई जगात शोधूनही सापडणार नाही. कारण जन्म देवून आपल्या बाळाला बेवारस सोडणारी माता असूच शकत नाही. ९ महिने स्वत:च्या उदरात आपल्या गर्भाला जीवापाड जपणारी माऊली जन्मानंतरचे आपले कर्तव्य पार पाडून मातृत्वाचे खरे दर्शन घडविते. लालन, पालन, पोषण, संगोपन, संवर्धन, संरक्षण या भूमिका पार पाडताना तिच्या ठायी ठायी ममत्वाची जाणीव होते.

आपल्या बाळासाठी आपले कतृत्व पार पाडत असताना सर्व प्रकारची दु:खे स्वत: झेलते, यातना सहन करते व बालकांवर योग्य संस्कार करून त्यांच्या मनाची जडण घडण निकोपपणे करते. आपल्या पवित्र दुधावर बाळाचा पिंड पोसते, घास भरवते, बोबडे बोल शिकविते, बाळाच्या बाललिला पाहून कृतकृत्य होते. ‘घार हिंडे आकाशी-चित्त तिचे पिलापाशी’ अशी अवस्था मातेची असते. आपल्या पोटाच्या गोळ्याला जीवापाड जपणे हा प्रत्येक मातेचा धर्म असतो व प्रत्येक माता आपला धर्म इमाने इतबारे पाळतात. आपल्या सानुल्याचे किंवा सानुलीचे शेकडो अपराध पोटात घालण्याची तयारी फक्त आईच दाखवू शकते.

आई बाळाचं नातं श्रेष्ठनातं- प्रत्येक आईला आपल बाळ नेहमी म्हणे जीव की प्राण वाटतो. बाळाच्या कल्याणार्थ सर्व प्रकारची दु:खे सहन करण्याची ताकत फक्त आईतच आहे. बाळाच्या भल्यासाठी आई जिवाचे रान करते. माता-बाळाच नातं एवढ श्रेष्ठ असतं की या नात्यापुढे जगातील सर्व नाती खुजी वाटतात, गौण वाटतात. बाळाच आईविना जगणं अर्थहिन असतं. ‘स्वामी तिन्ही जगाचा आईविना भूकेला’ या सुभाषिताच आई व बाळाच्या नात्याच श्रेष्ठत्व दडलेल आहे.

वात्सल्याचा सुखद ओलावा प्रत्येकाला हवा हवासा वाटतो- मातेविन जगणारी बालके जीवन जगतात. पण त्या जीवनाला वात्सल्य व ममतेची झालर नसते. मातेविना बालपण संस्कारहीन असतं. मातेचे बालपणीच संस्कार बाळाच्या मनाला विधायक व रचनात्मक दिशा देतात. प्रत्येक बालकाच्या डोक्यावर माया-ममता व मातेच छत्र असायलाच हव. मातेच्या वात्सल्याचा सुखद ओलावा प्रत्येकाला हवा हवासा वाटतो कारण यामुळेच जीवनाला योग्य दिशा मिळते.

मायेची माऊली-जगा देते सावली- खरोखर मातेच्या छत्रछायेची गरज प्रत्येक बालक बालिकेला आवश्यक होय. माय माऊली आपल्या बाळावर बालपणात जे संस्कार करते. वात्सल्याचा जो हात पाठीवरून फिरविते आपल्या सावलीत बाळाचे संगोपन संरक्षण व संवर्धन करते त्यामुळे बालकांच्या मनाची योग्य दिशेने वाढ होते. बालके चांगली व सुसंस्कारीत मायेच्या माऊली व सावलीतच घडतात. माऊलीच्या छात्रछायेला पित्याचीही जोड आहे- आई खरोखर श्रेष्ठ दैवत आहे. आई महान आहे. मात्र त्यास जोड पित्याचीही असते हे कदापिही विसरून चालणार नाही. मातेच्या कर्तव्याइतकेच श्रेष्ठत्व पित्याच्या कर्तव्यालाही आहेच. मायमाऊलीच्या छात्रछायेला पित्याच्या छायेचीही जोड आहे. त्यामुळे माता पिता दोघेही जगातले श्रेष्ठ दैवत आहेत. हे मुला मुलींनी कदापिही विसरू नये. जो आई वडिलांची सेवा करतो आई-वडिलांप्रती आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडतो. वृद्धापकाळी त्यांची काठी बनून त्यांना आधार देतो त्या मुला-मुलींना जगातील सर्व सुखे, समाधाने प्राप्त होतात. कारण आई-वडिलांची सेवा म्हणजे साक्षात परमेश्वराचीच सेवा होय.

**-धोंडिरामसिंह राजपूत**

# परिचारिकांविणा; सुना सुना दवाखाना!

**फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनतास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप- कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. रोचक माहितीपूर्ण असा श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा सदर संकलित लेख... संपादक.**

चीनच्या वुहान शहरापासून वाढत गेलेल्या कोरोना विषाणूच्या प्राणघातक संसर्गाने जगभर धुमाकूळ घातला. भारतातही कोरोना बाधितांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. कोरोनाच्या मोठ्या लढ्यात डॉक्टर, परिचारिका, पोलीस दोन वर्षांपासून चोख भूमिका बजावत आहेत. जागतिक स्तरावर मातृदिन, पितृदिन आणि आणखी काही दिवस साजरे केले जातात. तसेच रुग्णांची सेवा करणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी १२ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक परिचारिका दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९७१मध्ये आंतराष्ट्रीय परिचारिका परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. आधुनिक नर्सिंगच्या फाऊंडर लेडी फ्लोरेन्स नाईटिंगल यांचा जन्म ज्या तारखेला झाला, तो दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून घोषित करण्यात आला. तेव्हापासून अख्ख्या विश्वाच्या पाठीवर १२ मे हा दिवस जागतिक परिचारिका दिवस म्हणून साजरा करण्यात येतो. फ्लोरेन्स नाईटिंगल या धनाढ्य कुटुंबातून आल्या होत्या. तरीही त्यांनी आपले सर्व जीवन रुग्णसेवेला अर्पण करण्याचा निर्णय घेतला. अनेक आधुनिक सुश्रुषा पद्धती त्यांनी विकसित केल्या. लंडनमध्ये त्यांनी केलेल्या रुग्णसेवेमुळे सैनिकांचा मृत्यू दरही ६९ टक्क्यांवरून १८ टक्क्यांवर आला होता. त्या रात्री रात्री जागून तासनतास रुग्णांची सेवा करत असत. रात्री हातात लँप- कंदील घेऊन प्रत्येक रुग्णाची काळजी घेत असत. त्यामुळे त्यांना लॅम्प लेडी असेही म्हटले जात असे. थोडक्यात त्यांची माहिती-

फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म १२ मे १८२० रोजी झाला. त्या अग्रगण्य परिचारिका, लेखक व संख्याशास्त्रज्ञ होत्या. इ.स.१८५३ साली झालेल्या क्राइमियन युद्धादरम्यान जखमी सैनिकांची सुश्रुषा केल्याबद्दल त्यांना प्रसिद्धी मिळाली. त्यांना लेडी विथ द लॅम्प असेही म्हणत. अतिशय सुखवस्तू घराण्यात जन्म होऊनही परमेश्वराने आपल्याला भूतदयेसाठी व मानवतेची सेवा करण्यासाठीच जन्माला घातले, या भावनेने त्या प्रेरित झाल्या होत्या. रेडक्रॉसचे संस्थापक हेन्री ड्युनेन्ट यांनी त्यांना लेडी विथ द लॅम्प ही उपाधी दिली. त्यांच्या हातातील कौशल्य व वैज्ञानिक दृष्टिकोनातून रूग्णसेवा केल्यामुळेच परिचर्याशास्त्राला नवीन दिशा प्राप्त झाली. त्यांच्या सन्मानाप्रित्यर्थ १२ मे हा त्यांचा जन्मदिवस जगभरामध्ये जागतिक परिचर्यादिन म्हणून साजरा केला जातो. फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांना बालपणापासूनच गणितात गती होती. आकडेवारी आलेखांच्या माध्यमातून दृश्य सादरीकरण करणे, हे त्याकाळात फारसे प्रचलित नव्हते. विल्यम प्लेफेअर यांनी विकसित केलेल्या पाय आकृतीसारख्या आलेखांचा त्यांनी परिणामकारकरित्या वापर केला. नाइटिंगेल यांचे संख्याशास्त्रातील सर्वात महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे त्यांनी विकसित केलेली ध्रुवीय क्षेत्र आकृती होय. या प्रकारच्या आलेखास नाइटिंगेल रोझ प्लॅंट असेही म्हटले जाते. स्वतः काम करीत असलेल्या लष्करी रुग्णालयातील दर महिन्यातील मृत्यूंची संख्या व कारणे यांचे सादरीकरण करण्यासाठी त्यांनी या आकृतीचा वापर केला. एरवी आकडेवारीच्या जंजाळामुळे संसद सदस्य आणि सरकारी अधिकारी यांच्याकडून असे अहवाल दुर्लक्षित राहात असत. परंतु नाइटिंगेल यांनी केलेल्या प्रभावशाली दृश्य सादरीकरणामुळे सैनिकांसाठीच्या वैद्यकीय सुविधा किती अपुऱ्या आहेत? याची जाणीव होऊन या वैद्यकीय सुविधांचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न सुरू झाले. या सर्व कामामुळे रॉयल स्टॅटिस्टिकल सोसायटीच्या पहिल्या महिला सभासद होण्याचा सन्मान सन १८५९ साली नाइटिंगेल यांना प्राप्त झाला. पुढे अमेरिकन स्टॅटिस्टिकल असोसिएशनने देखील त्यांना सन्माननीय सदस्यत्व बहाल केले गेले. त्यांचे दि.१३ ऑगस्ट १९१० रोजी दुःखद निधन झाले.

परिचारिकांना आजही अनेक समस्या भेडसावत आहेत. तरीही त्या रुग्णसेवेला प्राधान्यक्रम देत त्या रुग्णांची सेवा करीत असतात. हजारो परिचारिका वैद्यकीय क्षेत्रात सक्रिय कार्यरत आहेत. मध्यंतरी मुंबईच्या महापौर किशोरी पेडणेकर यांनीही परिचारिकेचा गणवेश परिधान करून नायर रुग्णालयाला भेट दिली होती. किशोरी पेडणेकर यांनी काही वर्षांपूर्वी नायर रुग्णालयात परिचारिका म्हणून आपली सेवा बजावली होती. कोविड युद्धात स्वतः उतरून त्यांनी एकप्रकारे परिचारिकांना मानवंदना दिल्याचे सांगितले जाते. कोणत्याही रुग्णालयातील रुग्ण हा डॉक्टरांपेक्षा अधिक काळ परिचारिकेच्या देखरेखीखाली असतो. रुग्णालयात दाखल झालेल्या रुग्णांची त्या अहोरात्र सेवा करीत असतात. रुग्णाला सकारात्मकता प्रदान करणे व त्यांना आनंद देणे हे महत्त्वाचे कार्य त्या करीत असतात. आताच्या घडीलाही कोरोनासारख्या महाभयंकर व जीवघेण्या संकटकाळात त्यांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. कुटुंबांची, मुलांची, प्रसंगी आपल्या जीवाची पर्वा न करता दिवस-रात्र झटून त्या आपली सेवा अत्यंत चोखपणे बजावत असतात. अनेक रुग्णालयातील परिचारिका तर गेले कित्येक दिवस आपल्या घरीदेखील गेल्या नाहीत. वैद्यकीय क्षेत्रात त्यांचे योगदान अमूल्य असेच आहे. त्यांच्याशिवाय वैद्यकीय क्षेत्र पूर्णत्वास जाऊ शकत नाही. वैद्यकीय क्षेत्रातील रुग्णसेवेत प्रमुख भूमिका बजावणाऱ्या परिचारिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी जागतिक परिचारिका दिन साजरा केला जातो. कोरोना संकटकाळात त्या खऱ्या योद्धा बनून अहोरात्र रुग्णसेवा करत आहेत. त्यांच्या कार्याला माझा या शब्दप्रपंचाने सलाम!

!! रुग्णसेवेत सर्वस्व पणाला लावणाऱ्या जगातील समस्त सिस्टर्सना कोटी कोटी सॅल्यूट !!



- संकलन व शब्दांकन -
**श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.

# जनामनातून प्रगटीत व्हावे ही बुध्दाची निती!

**'बुध्दाचं** तत्वज्ञान म्हणजे शंतपण पण ठामपणे पण अन्यायाला विरोध करणं आणि समानतेसाठी लढणं. बुध्दमुर्ती केवळ धार्मिक नाही तर ती सामाजिक न्याय आणि समानतेची प्रेरणा आहे'.

आज समाजाचे एकंदर चित्र पाहिल्यावर असे दिसते की, समाज हा गरीबी, अज्ञान, अंधश्रध्दा, भ्रष्टाचार, पिळवणूक, लोभ, अनैतिकता यांनी ग्रासित झाला आहे. अशा अशुध्द मानव निर्मित वातावरणात व्यक्तीचा विकास साधणे अशक्यप्राय गोष्ट आहे. मग अशा समाजाचा विकास कितीही साधण्याचा प्रयत्न केला तरी विकास साधता येत नाही. कारण त्या ठिकाणी व्यक्तीच्या विकासाची काहीही तरतूद नाही, म्हणून असा समाज अविकसित असतो. व्यक्ती विकासाला पूर्णपणे स्वातंत्र्य देवून समाज हा विकसित व सुसंस्कृत बनविण्याचा मार्ग म्हणजे भगवान बुध्दांनी सांगितलेला ङ्गआर्य अष्टांगिक मार्गङ्ग आहे. सम्यकदृष्टि, सम्यक संकल्प, सम्यक वाणी, सम्यक कर्मान्त, सम्यक आजिविका, सम्यक व्यायत, सम्यक स्मृति व सम्यक समाधी या अंगानी परिपूर्ण असलेल्या मार्गाला भगवान बुध्द आर्य मार्ग संबोधतात. अष्टांगिक मार्गाला संपूर्ण तत्वज्ञानाचा गाभा मानल्या जातो. त्यामुळेच व्यक्तीचा सर्वांगिण विकास उपरोक्त मार्गानुसार आचरण केल्यास ङ्गनिब्बाणङ्ग प्राप्त करता येते.

भोग आणि क्लेश ही जीवनाची आत्यंतिक दोन टोके टाळून यामधला सुलभ, सरळ ज्ञानाचा सन्मार्ग म्हणजे तथागतांचा मध्यममार्ग होय. या मध्यममार्गाचा तथागतांनी केलेल्या शिकवणीचा उपदेश म्हणजे धम्म. सर्वप्रथम वैशाख पौर्णिमेचे महत्व समजावून घेणे आवश्यक आहे, कारण या दिवशी सिध्दार्थ गौतमाचा जन्म, ज्ञानप्राप्ती व महापरिनिर्वाण या तीनही घटना वैशाख पौर्णिमेच्याच दिवशी घडतात ही काही साधारण बाब नाही, हा चमत्कार ही नाही. याला एक आगळं-वेगळं महत्व आहे, ही वस्तुस्थिती आहे, हे सत्य कोणीही नाकारु शकत नाही. ज्यांचा आज आपण जन्मोत्सव साजरा करीत आहोत, अशा स्थितप्रज्ञ महामानवास त्रिवार वंदन.

विश्वबंधुत्व, समानता व मानवी स्वातंत्र्य, एकमेकांविषयी प्रेम भावना, करुणेची भावना इत्यादि मानवाच्या कल्याणासाठी हितकारक गुणतत्वे जोपासणाऱ्या विज्ञाननिष्ठ, तर्कशुध्द, निर्भेड व विशुध्द जीवन मार्गावर आधारित अलौकिक अशा पवित्र धम्माची स्थापना करणारे जगातील पहिले क्रांतिकारी महामानव म्हणजेच तथागत भगवान गौतम बुध्द होत. सिध्दार्थ गौतमाने रोहिणी नदीच्या वादातून गृहत्याग केला व परिव्रजा घेतली. कपिलवस्तुहून राजगृहास आले असता मगधधिपती राजा बिंबीसार यांनी त्याची भेट घेतली. राजा बिंबीसार यांनी सिध्दार्थ गौतमास ऐहीक सुखोपभोगाबाबत उपदेश केला आपण पुन्हा कपिलवस्तुत परतुन राज्योपभोग घ्यावा, तेथे जाणे उचित वाटत नसल्यास मी माझे अर्धे राज्य आपणांस देतो तेथे आपण राज्य करावे अशी विनंती केली, परंतू संन्यासाचा जीवन मार्ग अवलंबू नये.



तद्प्रसंगी सिध्दार्थाने राजा बिंबीसारला विचारपुर्वक गांभीर्याने खणखणीत उत्तर दिले सुख म्हणजे उपभोग, असे सर्वसाधारण मानले जाते. कसोटीला लागल्यास त्यापैकी एकही उपभोगण्याच्या योग्यतेचे आहे असे आढळत नाही. तहान भागविण्यासाठी पाण्याची आवश्यकता असते, तसेच भुक शमविण्यासाठी अन्न हवे असते आपली नग्नता झाकण्यासाठी व थंडी वाऱ्यापासून संरक्षण करण्यासाठी कपडयांची आवश्यकता असते, झोपेची गुंगी घालविण्यासाठी बिछाना असतो, प्रवासाचा शीण होवू नये म्हणून वाहन असते उभे राहण्याचा त्रास कमी करण्यासाठी आसन असते. तसेच शरीराची शुध्दी, आरोग्य यासाठी स्नान एक साधन असते. फक्त बाहय वस्तु म्हणजेच मानवाच्या दु:ख निवारण्याची साधने नव्हती. म्हणून अन्न-वस्त्र-निवारा इत्यादी मुलभुत गरजांना प्राधान्य न देता मानवी कल्याणाचा सुखाचा शोध घेण्यासाठी ज्ञान अर्थात शिक्षण महत्वाचे असते. मिळिवलेल्या ज्ञान चिंतनातून मानवाच्या कल्याणासाठी खास जीवनमार्ग शोधला ज्ञानाने व्यक्तीचा सर्वागीण विकास घडविण्यास मदत होते, हा संदेश संपुर्ण विश्वाला तथागताने दिला.

व्यक्ति विकासासाठी मानवास शिक्षणाचे-ज्ञानाचे महत्व किती आहे, हे आपल्या देशातील अनेक महामानवाने जाणले. मानवाचे कल्याण त्याचे सुख कशात आहे. याचा शोध घेता महामानवांना आढळले की, प्रथम प्रत्येक व्यक्ति ही शिक्षित- ज्ञानी झाली पाहिजेत. शिक्षणज्ञान मानवाच्या कल्याणाचे, सुखाचे प्रमुख अंग आहे. त्याचा विकासत राजमार्ग आहे, हा राजमार्ग सर्वप्रथम जगाला दाखविला महाकारुणिक गौतम बुध्दाने. भगवान बुध्दांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत. त्यांच्या विविध पैलूंचा अभ्यास विविध अंगानी व विविध दृष्टीकोणातून होणे आज आवश्यक आहे. तथागत बुध्दाच्या व्यक्तीमत्वामध्ये ज्याप्रमाणे चुंबकीय तत्व होते, त्याचप्रमाणे त्यांचे तत्वज्ञानामध्ये असे चुंबकीय तत्व होते की, ज्यामुळे असंख्य लोक त्यांच्या व्यक्तीम त्वाने प्रभावित झालेले होतेच. परंतू त्याही पेक्षा कितीतरी पटीने त्यांच्या तत्वज्ञानाने, त्यांच्या तत्वज्ञानातील सभ्यतेने प्रभावित होऊन त्यांनी त्याचे अनुयायीत्व स्विकारलेले होते. या संपूर्ण काळात बहुसंख्य जनतेची संपर्क भाषा ही प्राकृतच राहिली. प्राकृत ही लोकभाषा असल्याने तथागत गौतम बुध्दांनी आपले सर्व ज्ञान त्याकाळाची लोकभाषा असलेल्या पालीतूनच दिल्याचे स्पष्टपणे आढळते.

बुध्दाच्या व्यक्तिमत्वाची छाप व त्यांच्या तत्वज्ञानाची पकड इतकी मजबुत आहे की, भारत भुमीच्या या महापुत्राने केवळ भारताचाच नव्हे तर संपुर्ण विश्वालाच प्रभावित केलेले आहे. भारताच्या इतिहासामध्ये एवढा प्रतिभा संपन्न, प्रखर बुध्दिवादी, ध्येयवादी व मानवतावादी अजून कधी झालेला नाही. यापुढे देखील होणे नाही ज्याला संपुर्ण जग सन्मानपुर्वक विनम्र होत असते.

बुध्द हा अशा स्वयं प्रज्ञेचा माणुस होता की, ज्याने जगाला पहिल्यांदा प्रखर बुध्दिवादाची व ध्येयवादाची शिकवण दिली. भगवान बुध्द म्हणतात, अत्त-दिपो-भव, अत्त-विरहत, अत्त-सरणी अर्थात हे मानव प्राण्यांनो स्वत:चे दिप व्हा, स्वयं प्रकाशित व्हा आणि स्वत:ला शरण जावून स्वत:चच विचरण करा, दुसऱ्या कुणालाही शरण जावू नका, दुसरा कुणीही तुम्हाला शरण जाण्या योग्य नाही तुम्ही स्वत:च स्वत:चे शरणस्थान आहात, यामध्ये जगाच्या सभ्यतेचा व संस्कृतीच्या इतिहासामध्ये भगवान बुध्दाने पहिल्यांदा मनुष्याला परा प्रवृत्ती, दैव, ईश्वर, आत्मा परमात्मा संकल्पना पासून मुक्त होण्याचा महामंत्र दिला व तो जोपासून ठेवणे ही आजच्या काळाची गरज आहे.

धम्म हा जीवनाच्या विविधांगी पैलूंना स्पर्श करणारा असतो. केवळ वैयक्तिक मोक्षप्राप्ती नसुन इतर सर्व मानवाला मोक्षदाता म्हणुन हितकारक व लाभदायी ठरणारा असतो. म्हणूनच सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, नैतिकमूल्ये अशा सर्वच बाबींना स्पर्श करणारा तो मोठा वतुळ परिघ ठरतो. बुध्द आणि कार्ल मार्क्स'' या विषयी काठमांडू येथील विवेचनपूर्ण भाषणात त्यांनी समाजाला पर्यायाने प्रत्येक व्यक्तिला धम्माची नितांत गरज असल्याचे सांगीतले. 'धर्म ही अफुची गोळी आहे, ही कम्युनिस्टांची धारणा फोल ठरविली'. जगातील सर्वधर्म सारखेच आहेत ही धारणाही त्यांनी उखडून फेकली. बुध्दाचा धम्म हा आकाशातील अनेक ताऱ्यां पैकी कसा वेगळा आहे, त्याचे तेज कसे वेगळे आणि दैदिप्यमान आहे, हे सत्य जाणून घेण्यासाठी त्यांनी सर्वांना आवाहन केले होते हे विसरता येत नाही. 'जिथं अध्यात्म संपते, तिथं विज्ञान सुरु होते' आणि हेच सत्य तथागतांनी सांगितले.

बुध्दाचे चरित्र आणि चारित्र्य निमळ पाण्याच्या प्रवाहासारखे होते. तो करुणेचा महासागर होता, रंजल्या गांजल्यांचा तो कैवारी, सखा, मित्र आणि मार्गदर्शक होता.

जगाच्या इतिहासात अशी माणसे अपवादात्मक असतात अशा सम्यक सम्बुध्दाला अनुसरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आमच्या पुढे सर्जनशील आदर्श निर्माण केला. बुध्द-बाबासाहेब हे आमच्या सर्वकष मुक्तीचे मार्गदर्शक आहेत. त्यांनी आम्हाला सन्मार्ग उपलब्ध करुन दिला आहे, मार्गक्रमण आम्हाला करावयाचे आहे. त्यासाठी स्वयं प्रकाशित होवून आम्ही बुध्द-धम्म व संघ यांच्या प्रती एकनिष्ठ राहून धम्मचक्र प्रवर्तनाची सम्यक क्रांती गतीमान ठेवली पाहीजे. अशा महान तत्ववेत्यास त्यांच्या २५६९ व्या वैशाख पौर्णिमेच्या शुभेच्छा!

**- प्रविण बागडे** नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

## रणधुरंधर योद्धे महाराणा प्रताप यांना जयंती निमित्त शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे अभिवादन



**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

महाराणा प्रताप म्हणजे त्याग, सेवा, समर्पणाचे उत्तम उदाहरण. साहस, पराक्रम आणि शौर्याच्या बळावर त्यांनी केलेले कार्य प्रेरणादायी आहे.

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शहर जिल्हा काँग्रेस कमिटी तर्फे शहर जिल्हाध्यक्ष मा. शेख युसूफ यांच्या नेतृत्वाखाली आज महाराणा प्रताप यांच्या ४८५ व्या जयंती निमित्त महाराणा प्रताप उद्यान, कॅनॉट प्लेस येथे त्यांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करण्यात आले.

यावेळी शहर जिल्हाध्यक्ष शेख युसूफ, ब्लॉक अध्यक्ष भाऊसाहेब जगताप, माजी नगरसेवक इक्बालसिंग गिल, संतोष भिंगारे, अनिस पटेल, कैसर बाबा, संघठन महासचिव इंजि. विशाल बन्सवाल, अनिता ताई भंडारी, एकनाथ त्रिभुवन, अशोक डोळस, पप्पूराज ठुबे, रमाकांत गायकवाड, शेख रईस, दिलीप भोसले, योगेश थोरात यांच्यासह काँग्रेस चे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## खुलताबादः समीर शहा या युवकाने गळफास घेऊन संपवले जीवन

**खुलताबाद** – शहरातील गुलाब शाह कॉलनी येथील रहिवासी समीर शहा वय २८ वर्षे याने रविवारी (दि. ११) सकाळी



आपल्या राहत्या घरी गळफास लावून आत्महत्या केली, मात्र आत्महत्या कोणत्या कारणाने केली हे अद्याप स्पष्ट झाले नाही.त्याच्या पश्चात पत्नी, दोन मुले, वडील, भाऊ असा परिवार आहे. या घटनांची तपास पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दिनेश गोरे हे करायचा आहे.

## मोमिन अहमदोद्दीन यांचे निधन



**खुलताबाद** – शहरातील बडा दरवाजा येथील रहिवासी मोमिन अहमदोद्दीन अलीमोद्दीन (वय ६५) यांचे रविवारी (ता. ११) सकाळी अल्पशः आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, दोन मुले आणि नातवंडे असा परिवार आहे मोमिन कब्रस्तान येथे दफनविधी पार पडला.

## निधी वापस करो अभियान सध्या स्थगित - बागडे




**छत्रपती संभाजीनगर
(अट्टल मत प्रतिनिधी)**

सध्या देशात युद्धाचे ढग दाटून आले आहे. याकडे शासन, प्रशासन,नागरिकांचे लक्ष लागले आहे आंतरिक प्रश्नावर नंतर ही तोडगा काढता येऊ शकतो.

आंबेडकरी रिपब्लिकन मोर्चा ने छत्रपती शाहू महाराज यांच्या स्मृती पासून सामाजिक विभागाची निधी परत करा याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी निधी वापस करो अभियान राबविण्याचा निर्णय घेतला होता परंतु सध्या देशात युद्धाचे ढग दाटून आले असल्याने निधी वापस करो अभियान मागे घेण्यात आले आहे असे आंरिमोचे राष्ट्रीय अध्यक्ष नारायण बागडे यांनी राज्यातील संघटनेच्या जिल्हा अध्यक्षांना प्रसार माध्यमांतून जाहीर केले आहे.

सामाजिक न्याय विभागाची निधी राज्याचे अर्थमंत्री यांनी महिला बालकल्याण विभागाच्या खजानात टाकले आहे त्यामुळे सामाजिक न्याय विभागाच्या तिजोरीत खडखडाट झाल्याने सामाजिक न्याय विभागाला कोरड्या हाताने काम करावे लागत आहे असे दस्तुरखुद्द या विभागाचे मंत्री यांनी कबूल केले आहे या कडे शासनाने लक्ष द्यावे असे हि नारायण बागडे यांनी सांगितले.

# ‘सर्व लक्ष्य साध्य झाले, सर्व भारतीय वैमानिक सुरक्षित परतले’, लष्कराने दिली ऑपरेशन सिंदूरची संपूर्ण माहिती

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

दिनांक ७ मे रोजी पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधील ९ दहशतवादी छावण्यांवर, ऑपरेशन सिंदूरद्वारे करण्यात आलेल्या हवाई हल्ल्याची आणि त्यानंतर उद्भवलेल्या परिस्थितीत पाकिस्तानविरुद्धच्या कारवाईची माहिती देण्यासाठी तिन्ही भारतीय सैन्यांनी रविवारी संयुक्त पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत, नौदल ऑपरेशन्सचे महासंचालक (डीजीएनओ) व्हाइस ॲडमिरल एएन प्रमोद, भारतीय हवाई दलाचे महासंचालक एअर ऑपरेशन्स एअर मार्शल ए.के. भारती आणि डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी ’ऑपरेशन सिंदूर’ संबंधित संपूर्ण माहिती दिली.

रविवारी झालेल्या या पत्रकार परिषदेत एअर मार्शल ए.के. भारती म्हणाले की, आम्ही ठरवलेले लक्ष्य पूर्णपणे साध्य केले आहे आणि आमचे सर्व वैमानिक सुरक्षितपणे घरी परतले आहेत. भारतीय सशस्त्र दलांबद्दल ते म्हणाले की, आमचे सैन्य सध्या अतिशय सतर्क आहेत आणि कोणत्याही संभाव्य धोक्याला तोंड देण्यासाठी सज्ज आहेत. एअर मार्शल ए.के. भारती यांनी स्पष्टपणे सांगितले की भारताचे उद्दिष्ट शत्रूला योग्य उत्तर देणे आहे आणि मृतदेह मोजणे नाही. ते पुढे असे देखील म्हणाले की, आम्ही ज्या काही पद्धतीचा आणि साधनांचा वापर केला, त्यांचा शत्रूवर इच्छित परिणाम झाला आहे. त्यामुळे किती जण मारले गेले? किंवा किती जण जखमी झाले? हे मोजणे आमचे काम नाही. एअर मार्शल भारती यांनी स्पष्ट केले की भारताचे उद्दिष्ट अनावश्यक विनाश नाही तर दहशतवादाशी थेट जोडलेले लक्ष्य नष्ट करणे आहे.

**‘आम्ही तिथे हल्ला केला जिथे पाकिस्तानला सर्वात जास्त नुकसान झाले’, एअर मार्शल एके भारती**

एअर मार्शल एके भारती म्हणाले की, भारताने पाकिस्तानवर हल्ला केला जिथे त्याचे सर्वात जास्त नुकसान झाले. आम्ही संपूर्ण पश्चिम आघाडीवरील पाकिस्तानच्या हवाई दलाच्या तळांवर, कमांड सेंटरवर, लष्करी पायाभूत सुविधांवर आणि हवाई संरक्षण प्रणालींवर लक्ष्य केले. भारतीय हल्ल्यांमध्ये चकलाला, रफिक आणि रहीम यार खान सारख्या महत्त्वाच्या हवाई तळांचा समावेश होता. यानंतर, सरगोधा, भुलारी आणि जेकबाबाद सारख्या इतर महत्त्वाच्या लष्करी तळांवरही हल्ला करण्यात आला. ते म्हणाले की, या सर्व ठिकाणांच्या प्रत्येक यंत्रणेला लक्ष्य करण्याची आणि त्यापलीकडे जाण्याची पूर्ण क्षमता आमच्याकडे आहे.




**’३ दिवस चाललेला संघर्ष युद्धापेक्षा कमी नव्हता, आमचे ५ सैनिक शहीद झाले’ – डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई**

डीजीएमओ लेफ्टनंट जनरल राजीव घई यांनी पाकिस्तानी सैन्याच्या झालेल्या नुकसानीबाबत आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, नियंत्रण रेषेवर (एलओसी) ३५-४० पाकिस्तानी सैनिक मारले गेल्याच अंदाज आहे. जेव्हा ऑपरेशन सिंदूर सुरू करण्यात आले तेव्हा पाकिस्तानी सैन्याने भारतीय सैन्य आणि भारतीय सशस्त्र दलांच्या पायाभूत सुविधांनाही लक्ष्य केले. ते म्हणाले की, आमचे लक्ष्य फक्त दहशतवाद्यांच्या अड्ड्यांवर होते, पण जेव्हा पाकिस्तानने आमच्या पायाभूत सुविधांवर हवाई घुसखोरी आणि हवाई कारवाया सुरू केल्या तेव्हा आम्ही जड शस्त्रे वापरली. ते पुढे असे देखील म्हणाले की ‘३ दिवस चाललेला संघर्ष हा एखाद्या युद्धापेक्षा कमी नव्हता. आमचे सर्व वैमानिक सुखरूप परतले आहेत.‘ ऑपरेशन सिंदूरमध्ये आपले ५ सैनिक शहीद झाल्याचेही त्यांनी सांगितले.

**अरबी समुद्रात केली गेली ’ऑपरेशन सिंदूर’ ची चाचणी–** भारतीय नौदलाचे महासंचालक नौदल ऑपरेशन्स (डीजीएनओ), व्हाइस ॲडमिरल ए.एन. प्रमोद म्हणाले की, पहलगाम हल्ल्यानंतर, भारतीय नौदलाचे वाहक युद्ध गट, पृष्ठभागावरील लढाऊ युनिट्स, पाणबुड्या आणि नौदल विमान वाहतूक संसाधने पूर्ण युद्ध तयारीत समुद्रात तैनात करण्यात आली होती. ते म्हणाले की, हल्ल्याच्या ९६ तासांच्या आत, आम्ही अरबी समुद्रात अनेक शस्त्र चाचण्यांदरम्यान आमच्या रणनीती आणि ऑपरेशनल प्रक्रियांची चाचणी घेतली आणि त्यात सुधारणा केल्या. भारतीय नौदलाच्या शक्तिशाली उपस्थितीमुळे पाकिस्तानला त्यांचे नौदल आणि हवाई दल बंदरे आणि किनारी भागात मर्यादित ठेवावे लागले, ज्यावर सतत लक्ष ठेवले जात असे.

**कराची देखील लक्ष्य होते**

व्हाइस ॲडमिरल प्रमोद यांनी ’ऑपरेशन सिंदूर’ संबंधित झालेल्या या पत्रकार परिषदेत एक धक्कादायक खुलासा केला. ते म्हणाले की, आमची शत्रूवर प्रत्युत्तराची पद्धत संयमी, संतुलित, चिथावणीखोर आणि जबाबदार होती.

गरज पडल्यास हल्ला होऊ शकेल अशा ठिकाणांना लक्ष्य करण्याची तयारी देखील आम्ही केली होती. ज्यामध्ये कराचीचाही समावेश होता. त्यांनी असेही स्पष्ट केले की भारतीय नौदल अजूनही पूर्ण ताकदीने समुद्रात उपस्थित आहे आणि कोणत्याही प्रतिकूल कृतीला निर्णायक प्रत्युत्तर देण्यास ते सज्ज आहेत.

**शस्त्रसंधीनंतर काही तासांतच पाकिस्तानने केले उल्लंघन**

शनिवारी, १० मे रोजी संध्याकाळी अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी भारत-पाकिस्तान शस्त्रसंधीची अधिकृत घोषणा केली होती. त्याला काही तास होत नाहीच तोच, पाकिस्तानने त्याचे उल्लंघन केले. श्रीनगरसह, भारताच्या अनेक भागात पाकिस्तानचे ड्रोन आणि स्फोटांचे आवाज ऐकू आले. पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केल्यानंतर काही तासांतच भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने कठोर भूमिका घेतली आहे. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार, पाकिस्तानच्या या कृतीला प्रत्युत्तर देण्यासाठी लष्कराला कठोर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

# अवमान याचिकेत जलसंपदाचे सचिव दीपक कपूर यांच्यासह इतरांना नोटीस बजावण्याचे आदेश

**खुलताबाद (अट्टल मत प्रतिनिधी)**

गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळां अंतर्गत लघुपाटबंधारे विभाग क्र- १ , छत्रपती संभाजीनगर या विभागाच्या कार्यक्षेत्रात २०१९-२० आणि २०२०-२०२१ या वर्षातील वसंतराव नाईक हरीत योजनेत अस्तित्वात नसलेल्या क्षेत्रावर आणि तांत्रीक दृष्ट्या अनुज्ञेय नसणाया क्षेत्रावर कागदोपत्री वृक्षारोपण करून शासनाला कोट्यावधी रुपयाचे चुना लावून भ्रष्टाचार केला गेला आहे. असे आरोप सामाजिक कार्यकर्ते रउफ पटेल यांनी सतत विंनती अर्ज,व आंदोलन करून संबंधीतांकडे विभागीय चौकशीची मागणी केली होती.

दि १/६/२०२२ रोजी प्राथमिक चौकशी साठी अधिक्षक अभियंता ईलीयास चिश्ती,व कार्यकारी अभियंता मंगेश खैरनार व उपअभियंता मिलिंद नाकाडे यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती स्थापन केली होती.

या समितीने उपलब्ध अभिलेखे व प्रत्यक्ष कार्यक्षेत्राची तपासणी करून दि १४/९/२०२२ रोजी सविस्तर व स्वयंस्पष्ट अहवाल देवून विभागीय चौकशीची शिफारस केली. मात्र संबंधीत अधिर्कायांनी केवळ दोषारोप देवून विभागीय चौकशी अधिकारी नेमणूकीची कार्यवाही जाणूनबुजून टाळली. सामाजिक कार्यकर्ते रउफ पटेल यांनी मा उच्च न्यायालयात फौजदारी याचिका १८४१/२०२२ दाखल केली. मा उच्च न्यायालयासमोर दि २३/१०/२०२४ रोजी सुनावणी झाली असता शासनाच्या वतीने सहा महिन्यांत विभागीय चौकशी पुर्ण करण्याचे शपथपत्र सादर केले .मा उच्च न्यायालयाने दि.२८/४/२०२५ रोजी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा असे आदेश देवून याचिका निकाली काढली होती.मात्र दि २८/४/२०२५ पर्यंत सतत पाठपुरावा करून ही कार्यवाही झाली नसल्याने याचिकाकर्ते रउफ पटेल यांनी मा.उच्च न्यायालया समोर अवमान याचिका दाखल केली आहे.

दि ७/५/२०२५ रोजी मा.न्यायालयाने याचिका दाखल करून घेऊन जलसंपदाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर,गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार व मुख्य अभियंता जलसंपदा, जयंत गवळी छत्रपती संभाजीनगर यांना नोटीस देवून ६ आठवड्यात आपली बाजू मांडण्याचे आदेश दिले आहेत.या चिकाकर्ते रउफ पटेल यांच्या वतीने ॲड विशाल बागल हे काम पाहात असून सहाय्यक म्हणून ॲड. किशोर तौर सहकार्य करीत आहेत.

# जगातील सर्वात मोठ्या गोवर्धन गोशाळेचा मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शुभारंभ

**कणकवली (अट्टल मत प्रतिनिधी)**

करंजेच्या माळरानावर उभे झालेले नंदनवन म्हणजे कै. तातु सिताराम राणे ट्रस्ट संचलीत गोवर्धन गोशाळा! या गोशाळेचा दिमाखदार शुभारंभ रविवारी ११ मे रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी केंद्रीय मंत्री खा. नारायण राणे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे, आ. निलेश राणे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर व मंत्रीगण उपस्थित होते.

हिरव्या वनराईने नटलेल्या, निसर्गरम्य करंजे गावात सुमारे ७० एकर जागेत अत्याधुनिक ‘गोशाळा’ उभारण्यात आली आहे. या गोशाळेत गीर, साहीवाल, देवणी, पुंगनूर आदी भारतातील व महाराष्ट्रातील विविध जातींच्या तसेच खिल्लार, स्थानिक कोकण कपिला अशा विविध गायी आहेत. करंजे गावातील गोशाळेत दुधापासून तयार केले जाणारे विविध पदार्थ विक्रीसाठी ठेवले जाणार आहेत. गोमूत्र वापरुन तयार केलेली ओषधे, खते, गोबरगॅस आणि रंग यांची खरेदी या गोशाळेच्या माध्यमातून लवकरच करता येईल. करंजेमध्ये गोशाळेसह शेळी - मेंढीपालन, कुक्कुटपालन हे प्रकल्पही लवकरच सुरू केले जाणार आहेत. या प्रकल्पांमुळे करंजे तसेच आसपासच्या गावांतील तरुण - तरुणींना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे. पशुपालन, दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन, कुक्कुटपालन, खत निर्मिती,दुग्धजन्य पदार्थ निर्मिती आदी विषयावर विविध चर्चासत्रे, अभ्यास शिबीरे, कार्यशाळा घेण्याचेही गोशाळेचे नियोजन आहे. या कार्यक्रमांमध्ये तज्ज्ञ मंडळी मार्गदर्शन करणार आहेत.

# समाजसेविका सौ. अनिताताई वानखडे यांचा भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

संभाजीनगर जिल्ह्यातील ऐतिहासिक पैठण तालुक्यात सर्वसामान्यांमध्ये समाजसेविका म्हणून आणि आम्ही वाचकच्या संपादिका राष्ट्रवादी काँग्रेस

पक्षातील धडाडीच्या नेत्या सौ अनिता ताई वानखडे यांनी नुकताच भारतीय जनता पक्षाचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री माजी प्रदेशाध्यक्ष खासदार रावसाहेब दानवे पाटील यांच्या हस्ते भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश घेतला अनिताताई वानखडे या भ्रष्टाचार विरोधी काम करणाऱ्या धडाडीच्या

नेत्या आहेत त्यांनी आजपर्यंत शासकीय आणि खाजगी स्तरावरी आणि भ्रष्टाचार बाहेर काढले आहेत त्याचबरोबर



ग्रामीण भागातील समस्यांची जाण असणाऱ्या ग्रामीण भागातील जनतेशी त्यांची जोडलेली नाळ आणि त्यांची काम करण्याची पद्धती यामुळे त्या सर्व दूर परिचित अशा समाजसेविका आहेत तसेच आम्ही वाचक या साप्ताहिकाच्या संपादिका म्हणून अत्यंत प्रभावीपणे भूमिका पार पाडत आहेत यांचा जनसंपर्क दांडगा आहे त्याचा फायदा नक्कीच भारतीय जनता पक्षाला होईल आणि छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यामध्ये पक्षाची ताकद वाढविण्यासाठी वानखडे ताईचा फायदाच भाजपला होईल यांच्या पक्षप्रवेशाचे स्वागत प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे भाजप नेते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस मराठवाड्यातील भाजपच्या नेत्या पंकजाताई मुंडे भाजपने ते आणि राज्यपाल हरिभाऊ बागडे नामदार मंत्री महोदय अतुल सावे माजी केंद्रीय मंत्री डॉक्टर भागवत कराड आमदार संजय केनेकर महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा आमदार चित्राताई वाघ, जिल्हा चे नेते कल्याण नाना गायकवाड, सतिश अहेर, भास्कर कुलकर्णी ,पैठणचे माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे , तालुका अध्यक्ष लक्ष्मण लक्ष्मण आवटे, तुषार भाऊ शिसोदे , छत्रभुज शेळके, निखील गुप्ता, अनिता दाभाडे, सुलोचना सोळंके, नम्रता पटेल,प्रल्हाद ऐखंडे, आदींसह अनेकांनी अनिताताई वानखडे यांच्या प्रवेशाचे स्वागत केले आहे.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com.